बापूजींच्या गोड गोष्टी

साने गुरुजी

बापूजींच्या गोड गोष्टी

भाग पहिला

साने गुरुजी

साधना प्रकाशन, पुणे

किंमत ५० पैसे

दोन शब्द

बापूजींच्या गोड गोष्टी, भाग पहिला, या पुस्तकाचे हे नववे पुनर्मुद्रण. असे बारा भाग तयार करण्याची गुरुजींची मनीषा होती. परंतु सहा भागच तयार होऊ शकले.

गुरुजींच्या जीवनात गांधीजींचे स्थान अद्वितीय असे होते. गांधीजींना ते आपला जीवनसूर्य मानीत.

गांधीजींनाही गुरुजी माहीत होते. पंढरपूरच्या मंदिराच्या उद्घाटनानंतर ता. २५-११-४७ च्या प्रार्थना प्रवचनात गांधीजींनी गुरुजींचा गौरव केला. म्हणाले : "दूसरी खुशी की बात यह है कि पंढरपूर का पुराना और मशहूर मंदिर ठीक उन्ही शर्तोंपर हरिजनों के लिये खोल दिया गया है जैसा कि दूसरे हिंदुओं के लिये। अिस का खास श्रेय साने गुरुजी को है, जिन्हों ने उसे हरिजनों के लिये हमेशाके वास्ते खुलवाने के मकसद से आमरण उपवास शुरू किया था।"

गुरुजींना गांधीजींविषयी काय वाटत होते ते गुरुजींनी लिहिलेच आहे.

महात्माजींच्या जीवनातील सुहृदय व वेचक गोष्टी गुरुजींनी सहा भागांत दिल्या आहेत. त्या सर्वांना आवडल्या आहेतच. गुरुजींच्या अपेक्षेप्रमाणे त्या सर्वांच्या जीवनात क्रान्ती करोत.

— प्रकाशक

नववी आवृत्ती : मार्च १९६९ : © साधना ट्रस्ट

प्रकाशक : प्रभाकर सिद्ध, साधना प्रकाशन, ४३०-४३१ शनिवार पेठ, पुणे २.
मुद्रक : कृ. वि. बोंद्रे, जनवाणी प्रिंटिंग प्रेस, ४५ बुधवार पेठ, पुणे २.

बापूजींच्या गोड गोष्टी

लहान मुले म्हणजे आनंद. लहान मुले म्हणजे जगाची आशा. मुले म्हणजे निर्मलता; मुले म्हणजे उत्साह. मुक्त पुरुषांजवळ एक प्रकारची मुलांची वृत्ती असते. महात्माजी मुलाप्रमाणे निष्पाप होते. म्हणून त्यांच्या गोष्टींना मुलाची गोष्ट सांगूनच मी आरंभ करणार आहे.

महात्माजींना मुले फार आवडत. जगातील सारे धर्मात्मे पहा. त्यांचे मुलांवर फार प्रेम असे. मुहमद पैगंबरांना रस्त्यात मुले भेटत. ती त्यांना बाजूला ओढून नेत व म्हणत, 'किस्सा सांगा.' किस्सा म्हणजे गोष्ट. येशू ख्रिस्तही मुलांचे मोठे प्रेमी. आणि आपला भगवान गोपालकृष्ण, तो तर गोपाळ-बाळांबरोबर खेळे. महात्माजींनाही मुलांचे मोठे वेड. फिरायला जाताना ते मुलांना बरोबर घ्यायचे. जुहूच्या समुद्रतीरावर मुलांची काठी धरून महात्माजी हसत जात आहेत असे चित्र तुम्ही पाहिलेच असेल. परंतु मी जी गोष्ट सांगणार आहे ती साबरमती आश्रमातील आहे.

नित्याप्रमाणे आश्रमातून बापूजी फिरायला निघाले.

आश्रमीय मुलेही निघाली. हसतखेळत फिरणे सुरू झाले. फिरताना महात्माजींची प्रश्नोत्तरे चालूच असतात.

" बापू, तुम्हांला एक विचारू ? " एका मुलाने प्रश्न केला.

" हा बेटा. "

" अहिंसा म्हणजे दुसऱ्याला दुःख न देणं असा ना अर्थ ? "

" बरोबर. "

" तुम्ही हसत हसत आमचे गालगुच्चे घेता. ही हिंसा की अहिंसा ? "

" अरे लबाडा ! " असे म्हणून मोठ्याने हसून बापूंनी त्याचा जोराने गालगुच्चा घेतला. टाळ्या वाजवून " बापू चिडले, बापू चिडले " असे म्हणून मुले हसू लागली; महापुरुषही त्या हास्यरसात रंगून गेला.

☆ ☆ ☆

२

मित्रांनो, महात्माजींच्या जीवनरामायणातील आज दुसरी गोष्ट मी सांगणार आहे. मला फार वेळ नसतो, म्हणून मी छोट्याछोट्या गोष्टीच सांगेन. मोठ्या गोष्टी तुम्ही मोठे व्हा नि वाचा. खरे ना ?

बेळगावला १९२४ मध्ये राष्ट्रीय सभेचे (काँग्रेसचे)

अधिवेशन होते. श्री. गंगाधरराव देशपांडे व इतर कार्यकर्ते यांनी केवढी व्यवस्था ठेवली, केवढा सोहळा मांडला ! सारे सुखावले, आनंदले. महात्माजी कार्यमग्न होते. तेच तेथल्या काँग्रेसचे अध्यक्ष होते. काँग्रेसची बैठक संपली. सारे जायला निघाले. कोणी आजूबाजूची निसर्गरम्य स्थळे पहायला गेले. एक कार्यकर्ते गांधीजींकडे आले आणि म्हणाले :

"गांधीजी, शरावतीचा धबधबा पहायला तुम्ही याल ? हिंदुस्थानातीलच नव्हे तर जगातील सर्वांत उंच असा हा धबधबा आहे, — आठशे फूट उंचावरून तो पडतो. भव्य असं दृश्य आहे. याल का ? महादेवभाई, काकासाहेब यांनाही यायची इच्छा आहे. तुम्ही याल तर तेही येतील. नाही म्हणू नका !"

"मी कसा बरं येऊ ? मी का आता स्थळं पहात हिंडू ?" काम किती पडलं आहे ! महादेवलाही नाही येता येणार. काकांना न्या."

"गांधीजी, इतक्या उंचावरून पडणारा तो धबधबा खरोखर प्रेक्षणीय आहे. कसे तुषार उडतात, कशी इंद्रधनुष्यं दिसतात ! किती उंचीवरून पाणी पडतं आहे ! आपण गंभीर निसर्गाच्या, मूर्तिमंत अनन्ततेच्या अगदी सन्निध आहो असं वाटतं. तुम्ही पाहिला आहे का एखादा धबधबा उंचावरून पडणारा ?"

" हो, कितीदा तरी पाहिला. "

" शरावतीइतका उंच ? "

" त्याच्याहूनही उंच. "

" शरावतीच्या धबधब्याहून उंच असा धबधबा साऱ्या जगात नाही. आम्ही तरी भूगोलात वाचला नाही. "

" भूगोलात नसेल, परंतु मी डोळ्यांनी तो कितीदा तरी पाहतो. आणि तुम्हीही तो पाहिला आहे. किती उंचावरून ते पाणी पडतं ! "

" कोठली ही नदी ? कोठलं हे पाणी ? आम्ही काही पाहिलं नाही. "

" पावसाचं पाणी ! पर्जन्य-धारा किती उंचावरून पडतात ! ते पाणी शरावतीच्या पाण्यापेक्षा अधिक उंचीवरून नाही पडत ? मी खरं सांगितलं की नाही ? "

सारे हसले. महात्माजीही हसले. काकासाहेब नि इतर मंडळी धबधबा बघायला गेली. महात्माजींनी त्यांना जाण्यास सांगितले, परंतु ते आपल्या कार्यात मग्न झाले.

महादेवभाई पुढे पुष्कळ दिवसांनी एकदा कामासाठी म्हैसूरला गेले असता त्यांनी तो धबधबा पाहून यावे म्हणून गांधीजींनी व्यवस्था केली होती.

☆ ☆ ☆

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

३

आज मी जरा गंभीर गोष्ट सांगणार आहे. महात्माजींनी सर्व प्रकारची भीती प्रयत्नपूर्वक आपल्या जीवनातून काढून टाकली होती. ते निर्भय झाले होते. निर्भयता म्हणजेच मोक्ष. संस्कृतात वचन आहे :

" आनंदं ब्रह्मणो विद्वान् न बिभेति कदाचन । "

याचे मी मराठी करून सांगू ? ऐका.

" ब्रह्मानंदास जो जाणी नसे त्यास कुठे भय । "

महात्माजी चराचरात स्वतःचा आत्मा बघत. मग जेथे आपलाच आत्मा बघायचा तेथे कोणी कोणाची भीती धरायची ? खरे ना ?

मी सांगणार आहे तो प्रसंग असा :

रौलेट कायद्याविरुद्ध प्रचंड चळवळ देशभर महात्माजींनी केली. त्यातून जालियनवाला बाग झाल्या. त्यातून असहकार, कायदेभंग पुढे येणार होते. दौरे काढून थकले भागलेले महात्माजी आश्रमात विश्रान्तीसाठी आले होते. त्या वेळेस आश्रम लहान होता. तीनचार वर्षे तर स्थापून झाली होती. विनोबाजींसारखे, अप्पासाहेब पटवर्धनांसारखे तेजस्वी, ध्येयार्थी साधक आश्रमाला येऊन मिळाले होते. आणि १९१९ मधील २ ऑक्टोबरचा दिवस आला. गांधीजींना ५० वर्षे पुरी होऊन ५१ वे आज लागणार होते. आश्रमीयांनी लहानसा

आनंद–समारंभ करण्याचे ठरविले. माला, हार, तोरणे लावून सर्वत्र शोभा आणण्यात आली. समारंभाची वेळ झाली. गांधीजी येऊन बसले. सभोवती सत्यार्थींचा मेळावा होता. जणू चंद्राभोवती तारे, सूर्याभोवती किरण, कमळाभोवती भुंगे. गांधीजी बोलू लागले. ते म्हणाले :

"आज मला ५० वर्षे पुरी झाली. म्हणजे माझी निम्मी हयात गेली. आता थोडी वर्षे राहिली. मला ५१ वे नवे वर्ष लागले. पन्नाशी उलटली म्हणून तुम्ही आनंद दाखवीत आहात. माझा एकावन्नावा जन्मदिन आला म्हणून मोठ्या खुशीत आहात. प्रभूला तुम्ही धन्यवाद देत आहात. ठीक. आणि या माळा, नि हे हार. मला त्यांची विशेष गोडी नाही. परंतु तुम्ही प्रेमाने सारे केले आहे. तुमची भावना मी जाणू शकतो. ठीक आहे. परंतु मला जी एक गोष्ट सांगायची आहे ती विसरू नका. तुम्ही माझा वाढदिवस जितक्या आनंदाने साजरा करीत आहात तितक्याच आनंदाने माझ्या मृत्यूचा दिवसही तुम्ही साजरा करा. आज ज्याप्रमाणे प्रभूचे आभार मानीत आहात त्याचप्रमाणे त्याने मला नेले म्हणजेही त्याचे कृतज्ञतापूर्वक आभार माना. जीवन व मरण दोन्ही त्याच्याच मंगल देणग्या. नाही तर माझ्या मरणाच्या वेळेस रडत बसलात तर हा विनोबा येथे सारखी गीता वाचतो त्याचा काय उपयोग?"

महात्माजींनी मरणाचे भय आपल्या मनातून आफ्रिकेत असल्यापासून संपूर्णपणे काढून टाकले होते. ते मुक्त पुरुष होते.

☆ ☆ ☆

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

४

मनाच्या एकाग्रतेत विलक्षण शक्ती असते. मन एकाग्र करूनच एकलव्य धनुर्विद्या शिकला. मन एकाग्र केले तर सारे प्रश्न सुटू लागतात. सूर्याचे किरण भिंगातून एकत्र करून कापसावर पाडले तर ठिणगी पडते. विखुरलेल्या किरणांत ही शक्ती नाही. मनाची शक्ती विखुरलेली असेल तर तुम्हांला जगात सिद्धी मिळणार नाही.

महापुरुषाजवळ अशी एकाग्रता असते. प्रयत्नाने, ब्रह्मचर्याने ते ती मिळवतात. विवेकानंद अमेरिकेत असताना एक बाई तापाने फणफणताना त्यांनी पाहिली. ते तिच्याजवळ गेले. तिचा हात हातात घेऊन ते ध्यानस्थ उभे राहिले. नंतर डोळे उघडून ते म्हणाले : "तुमचा ताप गेला आहे." आणि खरेच गेला! मनाची अशी संकल्पशक्ती, इच्छाशक्ती असते. म्हणून दुसऱ्याचे भले चिंतावे. आपल्या मनातील विचारांचाही परिणाम जगावर होतो. एकाग्र विचारांचा तर फारच होतो.

मी तुम्हांला सांगणार आहे बापूजींची गोष्ट. १९२७ मधील प्रसंग. बापूजी मद्रासला गेले होते. त्यांना कळले की, ब्रिटिश मजूर पुढारी, प्रसिद्ध समाजवादी फेनर ब्रॉकवे हे मद्रास हॉस्पिटलात आजारी आहेत. महात्माजींची व्यापक सहानुभूती कशी स्वस्थ बसणार? अशा बाबतीत ते फार

दक्ष असतात. ते हॉस्पिटलमध्ये गेले. फेनर ब्रॉकवे अत्यवस्थ होते. ते बेचैन होते.

" तुम्हांला भेटायला आलो आहे." गांधीजी म्हणाले.

" कृपा." ते म्हणाले.

" कृपा प्रभूची. तुम्हांला फार त्रास का होतो ? "

" फारच अस्वस्थ वाटतं. "

" का बरं ? "

" झोप तर बिलकुल लागत नाही. जरा झोप लागेल तर किती बरं वाटेल ! "

" खरं आहे. झोप म्हणजे रसायन. " असे म्हणून गांधीजी त्यांच्या डोक्यावर प्रेमाने हात ठेवून उभे राहिले. त्यांनी डोळे मिटले. मन एकाग्र केले. त्यांनी का प्रभूची प्रार्थना केली ? की स्वतःची शान्ती त्या तप्त मस्तकात त्यांनी ओतली ? थोड्या वेळाने डोळे उघडून ते म्हणाले :

" आता तुम्हांला झोप लागेल. बरं वाटेल. सुखी व्हा."

असे म्हणून गांधीजी गेले. ब्रॉकवे आपल्या 'पन्नास वर्षांचा समाजवादी जीवनाचा इतिहास' या सुंदर आत्मचरित्रपर पुस्तकात लिहितात : " काय आश्चर्य ! गांधीजी गेले आणि काही वेळानं मला खरोखरच गाढ झोप लागली, आणि जागा झालो तो किती हुषारी वाटली ! "

एकाग्रतेत असे अद्‌भुत सामर्थ्य आहे.

☆ ☆ ☆

५

१९३१ साली कराचीची काँग्रेस भरली. ३० सालचा मिठाचा सत्याग्रह थांबला होता. सरकारशी झुंजून हिंदी राष्ट्र विजयी झाले होते. जगात हिंदी राष्ट्राची प्रतिष्ठा वाढली होती. व्हाइसरॉयने गांधीजींजवळ करार केला होता; आणि महात्माजी लंडनला गोलमेज परिषदेत भाग घ्यायला जाणार होते. कराची काँग्रेसने त्यांना आपले एकमेव प्रतिनिधी म्हणून निवडले. गांधीजी विलायतला निघाले. तेच कपडे, तोच साधेपणा. बरोबरच्या लोकांनी अधिक कपडे घेतले होते. गांधीजींनी ते एडनहून परत पाठवले. म्हणाले : "मी दरिद्रीनारायणाचा प्रतिनिधी आहे." पंचा लावून हा भारताचा योगिराणा, महान नेता, ख्रिस्ताचा अवतार लंडनला पोचला. मजुरांच्या वस्तीत ते राहिले. त्यांना नाही बाधली थंडी, नाही बाधला बर्फ. मुलांचे ते फार आवडते झाले होते. त्यांच्याबरोबर ते फिरत, हसत, बोलत.

वाटोळ्या परिषदेचे कार्य चालू होते. चर्चा, व्याख्याने रोज होत होती, परंतु जिनासाहेब काही चालू देत ना. परंतु मला तेथील हकीकती नाही सांगायच्या. गोलमेज परिषदेशिवाय महात्माजींना इतरही अनेक ठिकाणी जावे लागे. मुलाखती, भेटीगाठी, प्रश्नोत्तरं, वृत्तपत्रकार-परिषदा, सारखे काहीं ना काही चालू असे.

अशीच एक सभा होती. महात्माजी बोलले. त्यांनी ब्रिटिश राजवटीत हिंदुस्थानचा कसा सर्वतोपरी अधःपात झाला आहे ते निवेदले. भारतातील भीषण दारिद्र्याचे त्यांनी करुण-गंभीर चित्र उभे केले. सभा स्तब्ध होती. परंतु एकाने उठून विचारले :

" गांधीजी, ब्रिटिश भांडवलशाही सत्तेच्या आधाराने हिंदी जनतेस पिळीत आहे ही गोष्ट खरी, परंतु तुमच्या देशातीलही कारखानदार, जमीनदार, मालकवर्ग जनतेचे रक्तशोषण नाही का करीत ? तुमचे भांडवलवालेही पापी नाहीत का ? "

महात्माजी म्हणाले :

" देशातील भांडवलवालेही पापी आहेत. परंतु त्यांच्या पापाचे मूळ तुमच्यातच आहे. मी जर हिंसावादी असतो आणि गरिबांना नाडणाऱ्या माझ्या देशातील मालकांना मी जर दोन गोळ्या घातल्या असत्या तर ब्रिटिशांना मी चार घातल्या असत्या. तुमचे हिंदुस्थानातील पाप अपार आहे. शे-दीडशे वर्षांची लूट ! पर्वताप्रमाणं पापं ! हिंदी भांडवलशाहीच्या पापाला आता कोठे प्रारंभ आहे. "

कसे तेजस्वी उत्तर गांधीजींनी दिले ! गांधीजी निर्भय नि निःस्पृह होते. ज्याच्याजवळ सत्याचे अधिष्ठान असते तोच असे बोलू शकतो.

☆ ☆ ☆

६

तुम्ही दोन मित्र एकमेकांना भेटलात तर तुम्हांला किती आनंद होतो ! आणि पुष्कळ वर्षांनी भेटलात तर हा आनंद आणखी शतपट असतो. दोन मित्रांच्या भेटीत गोडी असते. कारण तेथे निर्मळ प्रेम असते. परंतु दोन थोर पुरुष परस्परास भेटतात तेव्हा तर अपूर्व गोडी असते. ती गंगा—यमुनांची भेट असते. ती चंद्रसूर्याची भेट असते. हरिहरांची ती भेट असते. समर्थ रामदास आणि संत तुकाराम यांची अशीच एकदा भेट झाली होती. एका नदीतीरी या दोन साधूंचे काय बोलणे होणार म्हणून हजारो लोक जमले होते. परंतु एकाने पाण्यात दगड टाकला. दुसऱ्याने आकाशाकडे बोट केले. दोघे निघून गेले ! त्याचा अर्थ काय ? एकजण म्हणाला : "पाण्यात दगड बुडतो त्याप्रमाणं हे लोक संसारात बुडत आहेत." दुसरा म्हणाला : "काय करणार ? प्रभूची इच्छा !"

परंतु मी तुम्हांला बापूजींची गोष्ट सांगणार आहे. येरवडा तुरुंगात महात्माजींनी १९३२ मध्ये उपवास सुरू केला होता. हरिजनांना हिंदुसमाजापासून कायमचे अलग करून टाकण्याचा इंग्रजांचा डाव होता. महात्माजींना ती गोष्ट असह्य झाली. देहाचा एक भाग कर्वतून वेगळा करणे कोणाला सहन होईल ? आणि हिंदुसमाजाचीही ती कायमची नामुष्की झाली असती. महात्माजींनी म्हणून उपवास सुरू केला. इंग्लंडचे त्या वेळचे

प्रधान मॅक्डोनल्ड यांनी दिलेला निवाडा बदलण्यासाठी तो उपवास होता. धावपळ सुरू झाली. येरवडा तुरुंग भारताचे राजकीय चर्चाक्षेत्र झाला. पंडित मदनमोहन मालवीय आले. राजाजी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर आले. शेवटी डॉ. बाबासाहेबांना मंजूर होईल असा पुणे करार झाला. सारे आनंदले.

त्या वेळेस येरवड्यास उपवास सुटायच्या वेळेस कोण कोण होते ? देशबंधू दासांच्या पत्नी वासंतीदेवी आल्या होत्या. देवी सरोजिनी होत्या. मदनमोहन होते आणि गुरुदेव रवीन्द्रनाथ होते. ते महात्माजींच्या जवळ आले. आंब्याच्या झाडाखाली महात्माजींची खाट होती. तो राष्ट्रपिता तेथे पडून होता. उपवास सुटायचा होता. रवीन्द्रनाथ महात्माजींच्या जवळ गेले. तो महान कवी भावनांनी ओथंबला होता. ते वाकले. महात्माजींच्या वक्षःस्थलावर डोके ठेवून ते कवीन्द्र, ते गुरुदेव लहान बालकाप्रमाणे रडले ! ते दृश्य डोळ्यांसमोर येऊन मी कितीदा सद्गदित झालो आहे ! तुम्हांला नाही का हा प्रसंग अति पावन नि मधुर वाटत ? भारतातील सारे सत्य, शिव, सुंदर त्या वेळेस येरवड्यास एकत्र झाले होते. थोर प्रसंग ! प्रणाम त्या पवित्र मंगल प्रसंगाला.

☆ ☆ ☆

७

बापूजी दिसायचे हाडकुळे. लोक म्हणायचे बापूजी म्हणजे मूठभर हाडांची जुडी. परंतु ते स्वतःच्या प्रकृतीची अत्यंत काळजी घेत असत. नीट नियमित आहार, फिरणे, मालीश, सारे असे. देह हे सेवेचे साधन आहे. ते स्वच्छ, सतेज राखणे कर्तव्य. देह प्रभूचे मंदिर आहे. ते काळजीपूर्वक बलवान ठेवणे कर्तव्य. महात्माजी दुबळेपणाचे पुजारी नव्हते. त्यांना अशक्तपणा– मग तो मनाचा वा शरीराचा खपत नसे. भरपूर खा, भरपूर सेवा करा, असे ते म्हणायचे.

पूज्य विनोबाजींची प्रकृती जरा अशक्त झाली होती. विनोबाजींनाच १९४० साली महात्माजींनी पहिला सत्याग्रही म्हणून नेमले होते. विनोबाजींसारखी सत्य–अहिंसेची मूर्ती आज महाराष्ट्रात, भारतात क्वचितच. साबरमतीच्या आश्रमात जी अगदी पहिल्याने सत्यार्थी मंडळी आली, तिच्यात तरुण विनोबाजी होते. असो.

विनोबाजी प्रकृतीची काळजी घेत नाहीत अशी तक्रार सेवाग्रामला गांधीजींजवळ करण्यात आली. गांधीजी एके दिवशी विनोबाजींना म्हणाले : “ तू प्रकृतीची काळजी घेत नाहीस. तुला आता मी माझ्या ताब्यात घेतले पाहिजे. तुझी प्रकृती चांगली दणकट केली पाहिजे.”

“ मला तीन महिन्यांची मुदत द्या. तेवढ्यात ती न

सुधारली तर मग मला आपल्या ताब्यात घ्या." विनोबाजी म्हणाले.

हिंदुस्थानचा संसार शिरावर असणाऱ्याला आपल्या प्रकृतीची चिंता कशाला असे मनात येऊन इच्छाशक्तीचे मेरू विनोबाजी प्रकृतीकडे लक्ष देऊ लागले. तीन महिन्यांत त्यांनी आपले २५ पौंड वजन वाढवून दाखविले. महात्माजी आनंदले.

महात्माजींना धष्टपुष्ट माणसे हवी होती. दुबळी नको होती. दुबळेपणा म्हणजे पाप हे ध्यानात धरा.

☆ ☆ ☆

८

महात्माजी आफ्रिकेतील सत्याग्रह यशस्वी करून हिंदुस्थानात परत आले होते. त्यांचे गुरू नामदार गोखले यांनी सांगितल्या-प्रमाणे ते हिंदुस्थानभर हिंडून येत होते. संयुक्त प्रांतात असताना त्यांना काही बिहारची मंडळी भेटली. बिहारमधील चंपारणात गोऱ्या मळेवाल्यांनी अपरंपार जुलूम चालविला होता. आलेले बिहारी शिष्टमंडळ म्हणाले : " गांधीजी, तुम्ही यातून मार्ग दाखवा."

" मी अवश्य येईन. परंतु तुम्ही माझ्या सांगीप्रमाणं वागलं पाहिजे." गांधीजी म्हणाले.

" सांगाल तसे वागू." ते म्हणाले.

" तुरुंगात जायची तयारी ठेवाल ? "

" हो."

त्याप्रमाणे ठरले आणि पुढे काही दिवसांनी चंपारणाच्या सत्याग्रहाला ते धावून आले. राजेन्द्रबाबू वगैरे बिहारमधील सत्याग्रही मंडळी याच वेळेस प्रथम गांधीजींना मिळाली. शेतकऱ्यांमध्ये काम तर सुरू झाले. परंतु गांधीजींना सर्व जनतेत चैतन्य उत्पन्न करावयाचे होते. ते बरोबरच्या काही स्वयंसेवकांस म्हणाले : "तुम्ही खेड्यापाड्यांतून शेतकरी मुलांच्या शाळा सुरू करा." कस्तुरबाही चंपारणात आलेल्या होत्या. गांधीजी एके दिवशी त्यांना म्हणाले : "तू का नाही शाळा सुरू करीत ? शेतकऱ्यांच्या मुलांत जा व त्यांना शिकव."

"मी काय शिकवणार ? त्यांना का मी गुजराती शिकवू ? मला बिहारी हिंदी अजून नीटसं येतही नाही." कस्तुरबा म्हणाल्या.

"अग, मुलांचं पहिलं शिक्षण म्हणजे स्वच्छता. शेतकऱ्यांची मुलं गोळा कर. त्यांचे दात बघ. त्यांचे डोळे बघ. त्यांना आंघोळ घाल. अशा रीतींने त्यांना स्वच्छतेचे पहिले धडे तरी देशील ? आईला हे करणं काही कठीण नाही, आणि असे करता करता त्यांच्याजवळ तू बोलशील, ती मुलं तुझ्याजवळ बोलतील. तुला त्यांची भाषा समजू लागेल व मग तू त्यांना पुढं ज्ञानही देऊ शकशील. परंतु स्वच्छतेचं ज्ञान उद्यापासूनच त्यांना नेऊन दे."

आणि कस्तुरबा दुसऱ्या दिवसापासून तसे करू लागल्या. बालगोपालांच्या सेवेचा अपार आनंद त्या लुटू लागल्या.

गांधीजी स्वच्छता म्हणजे ज्ञानाचा आरंभ असे समजत.

☆ ☆ ☆

९

पुष्कळांना वाटते की, गांधीजी रूक्ष मनुष्य होते. त्यांना जीवनात कला नको होती, गंमत नको होती अशी पुष्कळांची समजूत आहे. परंतु ती साफ चुकीची आहे. काठेवाडात डसो म्हणून लहानसे संस्थान आहे. दरबार गोपाळदास त्या संस्थानचे मालक. गांधीजी आफ्रिकेतून आल्यावर, त्यांच्या शिकवणुकीचा परिणाम दरबार गोपाळदासांवर फार झाला. त्यांनी आपले छोटेसे संस्थान आदर्श करण्याचे ठरविले. गावात साक्षरता सुरू झाली. प्रत्येकजण घरासमोर सडा, रांगोळी घालून ठेवी. गावात जनतेचे न्याय-मंदिर सुरू झाले. तेथे संस्थानिकावरही खटला चालविता येत असे. गावात निरनिराळ्या कलांनाही उत्तेजन देण्यात आले. सामुदायिक नृत्ये-गर्बे असे उत्सव होऊ लागले.

एकंदरीत डसो गोकुळासारखे गजबजू लागले. एकदा दरबार गोपाळदासांच्या मनात आले की आपली ग्रामीण नृत्यकला शहरवासीयांस दाखवावी. त्यांनी अहमदाबादला जाण्याचे ठरविले. डसोची ग्रामीण कलावान मंडळी बरोबर घेऊन दरबार गोपाळदास अहमदाबादला आले. अहमदाबाद शहरात ग्रामीण नृत्यांचे टिपऱ्यांचे अती सुंदर कार्यक्रम झाले.

प्रयोगानंतर दरबार गोपाळदास साबरमती आश्रमात

गांधीजींना भेटावयास गेले. " बापू, ग्रामीण नृत्यकलेचे खेळ शहरवासीयांसही अत्यंत आवडले बरं का. " ते म्हणाले.

" परंतु ते तुम्ही आधी शहरात दाखविलेत. माझ्या आश्रमात नाही दाखविलेत. " बापू म्हणाले.

" तुमच्या आश्रमात दाखवू ? "

" विचारता काय ! खेड्यातील निष्पाप कलांचा मी भोक्ता आहे. "

दुसरे दिवशी आश्रमात त्या ग्रामीण कलावंतांनी महात्माजीं-समोर अत्यंत सुंदर कार्यक्रम केला. कार्यक्रम चालू होता. महात्माजी दरबार गोपाळदासांना म्हणाले : " डसोचा राजा आपल्या गावी या खेळात भाग घेत असतो, हे मला माहीत आहे. मग येथे तो का भाग घेत नाही ? गोपाळकृष्ण गोपालां-बरोबर खेळायला का लाजेल ? " त्याबरोबर दरबार गोपाळदासही उठले. त्या ग्रामीण कलावंतांत ते सामील झाले. नाचता नाचता त्यांचे देहभान हरपले. त्यांस अपार आनंद झाला. गांधीजी खूष झाले.

दुसरे दिवशी आश्रमात त्या सर्व कलावंतांना गांधीजींनी मोठ्या प्रेमाने जेवण दिले व ते स्वतः त्यांचे वाढपी बनले.

असे बापू होते.

ग्रामीण जीवनात आनंद ओतणाऱ्या अकृत्रिम व निष्पाप कला बापूजींस अत्यंत प्रिय होत्या.

☆ ☆ ☆

१०

आठदहा वर्षांपूर्वीची गोष्ट असेल, महात्माजी त्या वेळी अलीकडल्याप्रमाणे सतत देशभर फिरत नसत. सेवाग्रामलाच ते स्थायिक असत.

त्यांचा वाढदिवस होता त्या दिवशी. आपण सामान्य माणसे स्वतःचा वाढदिवस गोडधोड खाऊन व नाचत गाजत दिवस घालवून साजरा करतो. पण आश्रमात असले काहीएक नसते. वाढदिवसाच्या दिवशी सर्व काही साधेपणाने चालते आश्रमात.

या वर्षीच्याही वाढदिवशी संध्याकाळी रोजच्याप्रमाणे सायंकाळी प्रार्थनेसाठी आश्रमातील मंडळी जमली. खास तयार केलेल्या उंच जागी गांधीजी प्रार्थनेसाठी बसले. तेथे नव्हती सजावट, नव्हते हारतुरे.

फक्त उंचवट्याच्या जागी गांधीजींच्या समोर एका नीरांजनात फुलवात मंदपणे तेवत होती. स्वतःला जाळून घेऊन जगाला प्रकाश देणारी ती फुलवात-जणू गांधीजींच्या जीवनाचे प्रतीक होती.

गांधीजींनी नीरांजनाकडे पाहिले, त्यांनी डोळे मिटले. प्रार्थना सुरू झाली.

आज प्रार्थनेनंतर गांधीजींचे वाढदिवसाच्या दिवशीचे खास प्रवचन होते. गांधीजींनी सुरुवातीलाच विचारले :

" हे नीरांजन कोणी लावलं ? "

कस्तुरबा म्हणाल्या : " मी. "

गांधीजी बोलू लागले : "आजच्या दिवसात सर्वांत वाईट अशी गोष्ट कोणती झाली असेल तर ती ही की, 'बा 'नं आज आश्रमामध्ये नीरांजन लावलं. आज माझा वाढदिवस म्हणून का हे नीरांजन लावलं? माझ्याभोवती पसरलेल्या खेड्यांत मी जातो तेव्हा मी पाहतो की खेडुतांना भाकरीवर लावण्यास तेलही मिळत नाही, आणि माझ्या आश्रमात आज तूप जाळलं जात आहे!" नंतर ते 'बा 'ना उद्देशून म्हणाले : "इतक्या वर्षांच्या सहवासात हेच का शिकलीस तू! खेडुतांना ज्या गोष्टी मिळत नाहीत त्यांचा उपभोग आपण नाही घेता कामा. माझा वाढदिवस असला म्हणून काय झालं? वाढदिवसाच्या दिवशी सत्कृत्य करायचं असतं; पाप नाही."

प्रवचन संपले. पण प्रवचनात सांगितलेला उपदेश मात्र 'बा ' पुढे कधी विसरल्या नाहीत.

महात्माजींच्या मनात नेहमी खेडुतांचा विचार असे. त्यांची सुखे तीच आपली सुखे, त्यांची दुःखे तीच आपली दुःखे, असे ते मानीत असत.

☆ ☆ ☆

११

मित्रांनो! महात्माजी निर्भय होते. प्रचंड हिंसेशी त्यांनी आत्मबलाने तोंड दिले. मरण तर त्यांना कधीच भिववीत नव्हते. त्यांच्याइतकी निर्भयता, वीरता दुसऱ्या कोणात असणार? मृत्यू हा त्यांचा सन्मित्रच होता.

परंतु महात्माजी आपल्या प्रकृतीची अत्यंत काळजी घेत. शरीराची हेळसांड म्हणजे पाप मानीत. या देहावर समाजाची मालकी आहे. समाजाची ही ठेव आहे. त्या ठेवीचा दुरुपयोग करण्याचा मला हक्क नाही, अशी त्यांची भावना होती.

एकदा बापूजी फिरावयास निघाले. वाटेत त्यांना ठेच लागली. त्यांच्या आंगठ्यातून रक्त वाहू लागले. बाजूला कस्तुरबा होत्याच.

"बा, लवकर तेलपट्टी आण. माझ्या आंगठ्याला बांध." बापूजी बोलले.

बा विनोदाने म्हणाल्या : "मरणाची भीती व दुःख तुम्हांस नाही असं तुम्ही म्हणता ना? मग यत्किंचित ठेच लागली, कोठे थोडं रक्त सांडलं, तर इतकं घाबरण्याचं काय कारण?"

बापूजी गंभीरपणे बोलले : "बा, या शरीराची मालकी जनतेची आहे. माझ्या हेळसांडपणानं जर आंगठ्यात पाणी शिरलं व तो अधिक बिघडला तर मला ७–८ दिवस काम करणं कठीण जाईल. त्यामुळं लोकांचं किती बरं नुकसान होईल? लोकांनी आपल्यावर टाकलेल्या विश्वासाचा तो घात करणं होईल."

बा शरमल्या. त्यांनी ताबडतोब मलमपट्टी आणून बापूजींच्या आंगठ्यास बांधली.

राष्ट्राच्या हिताची किती काळजी होती बापूंना.

☆ ☆ ☆

१२

मरणाची आपणा सर्वांस भीती वाटते, परंतु जीवन आणि मरण दोन्ही देवाच्या थोर देणग्या आहेत. दिवस आणि रात्र दोन्हींत मौज आहे. दिवसा सूर्य दिसतो, तर रात्री चंद्र–अगणित तारे यांची शोभा दिसते. अवस आणि पुनव दोन्ही आपण वंदिल्या पाहिजेत. लहान मूल आईच्या दोन्ही स्तनांतून भरपूर दूध पिते. जीवन आणि मरण म्हणजे जगन्मातेचे दोन स्तनच होत. दोन्हींतही आनंद आहे.

महात्माजी मृत्यूसही देवाची दया मानीत. 'मेलो तरीही देवाची कृपा समजा,' असे ते अनेकदा उपवासाच्या वेळेस म्हणायचे. १९१६–१७ मधील गोष्ट. बिहारमधील चंपारण भागात महात्माजी शेतकऱ्यांचा लढा चालवीत होते. गोरे मळेवाले सरकारच्या साहाय्याने अपरंपार जुल्म करीत होते. एकदा एक तरुण शेतकरी जवान लाठीमाराने डोके छिन्नभिन्न होऊन बळी पडला. त्याची आई म्हातारी होती. तिचा तो एकुलता एक मुलगा. तिच्या दुःखाला सीमा नव्हती. ती महात्माजींकडे येऊन म्हणाली : "एकुलता एक बाळ गेला—अरेरे ! तुम्ही त्याला करा ना जिवंत ?" महात्माजी काय करणार ? ते गंभीरपणे म्हणाले : "आई, तुझा बाळ मी कसा जिवंत करू ? माझी कोठे अशी शक्ती, अशी पुण्याई ? आणि असं करणं बरं नाही ! मी तुला दुसरा मुलगा देऊ ?"

असे म्हणून महात्माजींनी त्या वृद्ध माउलीचे ते कंपित हात आपल्या डोक्यावर ठेवले, आणि अश्रू आवरीत त्या मातेला म्हणाले : " या लाठी–हल्ल्यात गांधी मेला. तुझा मुलगा जिवंत आहे. तो हा तुझ्यासमोर आहे. तुझा आशीर्वाद मागत आहे." त्या अम्माला अश्रू आवरत ना. तिने महात्माजींना जवळ ओढून घेतले. त्यांचे डोके आपल्या कुशीत घेऊन, " माझा बापू " असे ती म्हणाली. तिने त्यांना " शताउक्षी व्हा " असा प्रेमळ आशीर्वाद दिला.

☆ ☆ ☆

१३

आपला देश एक मोठा अजबखाना आहे. संस्कृतीच्या सर्व पायऱ्यांवरचे प्रकार येथे दिसून येत असतात. ज्या गावात ज्ञानस्वरूप परमात्म्याची उपासना करणारा एखादा संन्यासी असतो, त्याच गावात कोंबडचा बकऱ्यांचे देवाला बळी देणारेही लोक असतात. आणि गावात मरीआईची साथ आली म्हणजे बकऱ्याची मिरवणूक काढून त्याला जिवंत पुरतात. असे बकरें पुरून का कॉलरा जातो? स्वच्छता आणा म्हणजे मरीमाय जाईल. अज्ञान, रूढी यांनी आपण ग्रस्त आहोत.

महात्माजी त्या वेळेस चंपारणात शेतकऱ्यांचा लढा चालवीत होते. एके दिवशी सायंकाळी एक मिरवणूक जात होती. आरडाओरडा होत होता. गांधीजींनी जवळच्या

कार्यकर्त्यांस विचारले : " कसला आवाज ? कसली मिरवणूक ? " तो कार्यकर्ता बोलेना. बळी द्यायला काढलेल्या बकऱ्याची ती मिरवणूक होती. महात्माजी उठले. ते त्या मिरवणुकीत सामील झाले. माळा घातलेल्या बकऱ्याबरोबर चालू लागले.

मिरवणूक देवीच्या मंदिराजवळ आली. महात्माजी त्या बकऱ्याजवळ होते, त्यांनी विचारले :

" बकऱ्याचा बळी कशासाठी ? "

" देवी प्रसन्न व्हावी म्हणून ! "

" बकऱ्यापेक्षा माणूस श्रेष्ठ आहे. माणसाचा बळी दिला तर देवी अधिकच प्रसन्न होईल. असा कोणी मनुष्य तयार आहे का पहा. नाही तर मी तयार होतो. "

कोणी बोलेना. सारे मुके होते. महात्माजी म्हणाले : " मुक्या प्राणाच्या रक्तानं का देवी प्रसन्न होते ? तशी ती प्रसन्न होणार असेल तर स्वतःचं अधिक मौल्यवान असं रक्त द्या. ते का नाही देत ? तेव्हा ही फसवणूक आहे. हा अधर्म आहे. "

" तुम्ही आम्हांला धर्म सांगा. "

" सत्यानं वागा. प्राणिमात्रांवर प्रेम करा. सोडा तो बकरा. आज ही जगदंबा तुमच्यावर जितकी प्रसन्न झाली असेल तितकी ती कधीच झाली नसेल. "

सारी मंडळी परतली. भगवान बुद्धांनी २६०० वर्षांपूर्वी एका यज्ञप्रसंगी जे केले तेच महात्माजींनी १९१६–१७ साली केले. महात्माजी म्हणजे प्रेमाची मूर्ती.

☆ ☆ ☆

१४

गांधीजींना मुलांच्या संगतीत अपार आनंद वाटे. मुलांची संगत म्हणजे देवाची संगत. मुलांबरोबर ते खेळतील, हसतील, गंमत करतील. एका मद्रासी मुलाने बापूजींजवळ 'कॉफी द्या' म्हणून हट्ट धरला तर त्यांनी त्या बाळाला आपण होऊन स्वतः कॉफी करून दिली. एवढेच नव्हे तर आणखी तुला काही करून देऊ का,—इडली, डोसा करून देऊ का, म्हणूनही प्रेमाने त्यांनी त्याला विचारले. गांधीजी सुंदर स्वयंपाक करीत. गांधीजींना सारे येत असे. जीवनाला जे जे उपयोगी ते ते त्यांना येत असे. गांधीजी सायकलवरसुद्धा बसत असत. परंतु ती गोष्ट पुढे सांगेन. आज दुसरीच जंमत सांगणार आहे.

१९२६ मधील ती आठवण आज सांगणार आहे. खादीच्या प्रचारार्थ महात्माजी दौऱ्यावर होते. विश्रान्तीसाठी म्हणून काही दिवस ते साबरमती आश्रमात परत आले होते. साबरमती शान्तपणे वहात होती. आश्रमातील मंडळी स्नानासाठी नदीवर जात असत. कोणी डुंबत, कोणी पोहत.

" बापूजी, आज तुम्ही पोहायला आलं पाहिजे."

" खरंच. आज बापूंना घेतल्याशिवाय जायचं नाही."

" परंतु बापू पोहणं विसरून गेले असतील !"

"पोहणं का कोणी विसरतो? बापू, येता ना पोहायला? तुम्ही कसे पोहता ते आम्हांला पाहायचं आहे."

"लोकमान्य टिळक पटाईत पोहणारे होते. गंगेच्या पुरात त्यांनी उडी घेतली. पलीकडे गेले."

"परंतु लोकमान्यांनी तालीम केलेली होती. बापू, तुम्ही आज दाखवा हं पोहून. गंमत."

"बापू नुसते हसताहेत. ते चालणार नाही,—चला. आज आमच्याबरोबर पोहायला चला!"

मुले आज गांधीजींना घेरून उभी होती. वरीलप्रमाणे बोलत होती. आणि गांधीजींनाही नाही म्हणवेना. ते निघाले. मुले आनंदली. सारा आश्रम निघाला. साबरमती उचंबळली. तिचे तरंग नाचू लागले. आज बापू लाटांबरोबरच दोन हात करणार होते. ब्रिटिश सत्तेशी दोन हात करणारा झुंजार योद्धा आज साबरमतीच्या लाटांबरोबर खेळ करणार होता. मुले पाण्यात शिरली. "बापू या, चला,—" म्हणून मुले म्हणू लागली. आणि गांधीजींनी उडी घेतली, सुरळी मारली. झपझप पाणी कापीत महात्माजी निघाले. मुले आनंदाने जयघोष करू लागली. टाळ्या वाजवू लागली. गांधीजींना टिपायला कोणी कोणी निघाली. मौज, केवढा आनंद! वयाच्या ५५ व्या वर्षी गांधीजी दीडशे यार्ड पोहून गेले! मुलांच्या आनंदासाठी बापू पोहून गेले! असे होते गांधीजी, असा होता आपला प्रेमळ राष्ट्रपिता.

☆ ☆ ☆

१५

महात्माजींना आपण भगवान बुद्ध किंवा भगवान येशू ख्रिस्त यांची उपमा देत असतो. भगवान बुद्धाप्रमाणे यज्ञातली हिंसा बंद करण्यासाठी महात्माजी 'मलाच बळी द्या' कसे म्हणाले ते मागे मी सांगितले. येशू ख्रिस्त ज्यांना सर्वांनी टाकलेले असे त्यांची सेवा करीत. महारोग्यांची सेवा करीत. गांधीजीही असेच सेवामूर्ती होते. चंपारणातील ती करुण-गंभीर गोष्ट आहे. तीस वर्षांपूर्वीची ती गोष्ट आहे. किसान सत्याग्रह चालू होता. महात्माजींच्या सत्याग्रहात सर्वांना भाग घेता येतो. लष्करी लढ्यात बंदूक चालविणारेच उपयोगी. परंतु रामनाम लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांनी घ्यावे, त्याचप्रमाणे सत्याग्रहात स्त्रिया, पुरुष, म्हातारे, मुले, अशक्त, दुबळे इत्यादी सर्व आपापल्या आत्म्याच्या जोरावर भाग घेऊ शकतात. सत्याग्रहात तमाम जनता सामील होऊ शकते. चंपारणातील त्या सत्याग्रही सेनेत महारोगाने पीडलेला एक शेतमजूर होता. तो पायांना चिंध्या गुंडाळून चाले. त्याच्या टाचा सोलून निघाल्या होत्या. सुजल्या होत्या. अपार वेदना होत असे. परंतु आत्मिक सामर्थ्याच्या जोरावर तो महारोगी झुंजार सत्याग्रही बनला होता.

एके दिवशी संध्याकाळी सत्याग्रही सैनिक छावणीत परत येत होते. त्या महारोगी सत्याग्रहीच्या पायाभोंवतालच्या

चिंध्या रस्त्यात सुटून पडल्या. त्याला चालवेना. टाचातून रक्त येत होते. इतर सत्याग्रही झपाट्याने पुढे गेले. महात्माजी सगळ्यांच्या पुढे असायचे. महात्माजी फार झपाट्याने चालत असत. दांडी-मार्चच्या वेळेसही बरोबरचे ८० सत्याग्रही मागे रेंगाळू लागत, परंतु महात्माजी झपझप पुढे जात. चंपारणात असेच होई. मागे राहिलेल्या त्या महारोगी सत्याग्रहीची आठवण कोणालाच राहिली नाही.

आश्रमात पोचल्यावर प्रार्थनेची वेळ झाली. बापूंच्या भोवती सत्याग्रही बसले. परंतु बापूंना तो महारोगी दिसला नाही. त्यांनी चौकशी केली. शेवटी एकाने सांगितले: "तो जलद चालू शकत नव्हता. थकल्यामुळं तो झाडाखाली बसला होता."

एक शब्दही न बोलता गांधीजी उठले. हातात दिवा घेऊन ते शोधार्थ बाहेर पडले. तो महारोगी रामनाम घेत एका झाडाखाली विव्हळत होता. बापूंच्या हातातील दिवा बघताच त्याचे तोंड आशेने फुलले. भरल्या आवाजाने 'बापू—' अशी त्याने हाक मारली.

"अरे तुला चालवत नव्हतं तर मला नाही का सांगायचं?" असे गांधीजी म्हणाले. त्याच्या रक्ताळलेल्या पायांकडे त्यांचे लक्ष गेले. तो महारोगी होता. इतर सत्याग्रही किळस येऊन मागे झाले. परंतु गांधीजींनी शाल फाडून त्याचे पाय गुंडाळले. त्याला आधार देऊन ते त्याला आस्ते आस्ते

आश्रमात, त्या शिबिरात घेऊन आले. नंतर त्यांनी त्याचे पाय नीट धुवून काढले. प्रेमळपणे त्यांनी त्याला स्वतःच्या जवळ बसविले. भजनास सुरुवात झाली. प्रार्थना झाली. तो महारोगीही भक्तिप्रेमाने टाळ्या वाजवीत होता. त्याचे डोळे घळघळत होते. त्या दिवशीची ती प्रार्थना किती गंभीर असेल, भावपूर्ण असेल, नाही ? असे होते आपले बापू !

☆ ☆ ☆

१६

महात्माजींची प्रत्येक गोष्ट हेतुपूर्वक असे. त्यांच्या कपड्यातील फरक पाहात गेलो तर त्यांच्या जीवनातील क्रान्ती कळून येईल. बॅरिस्टर असताना त्यांचा अगदी युरोपियन पोषाख होता. पुढे तो गेला. आफ्रिकेत सत्याग्रही पोषाख असे. हिंदुस्थानात आले तेव्हा काठेवाडी पागोटे, धोतर असा होता. परंतु एका फेट्यात किती तरी टोप्या होतील हे पाहून ते टोपी—गांधी-टोपी घालू लागले. पुढे सदरा, टोपी, याचाही त्याग करून फक्त पंचा नेसूनच हा महापुरुष राहू लागला, आणि पंचा नेसूनच ते सम्राटाला लंडनमध्ये भेटले! आणि चर्चिल त्या वेळेस चिडला. गरिबातल्या गरिबाशी एकरूप होण्यासाठी महात्माजींचा आत्मा तडफडत असे.

एकदा एका शाळेला भेट द्यायला महात्माजी गेले होते. हास्यविनोद चालू होता. एक मुलगा काही तरी म्हणाला. मास्तरांनी रागाने त्याच्याकडे पाहिले. महात्माजी त्या मुलाच्याजवळ गेले व म्हणाले :

"तू मला हाक मारलीस? काय सांगायचं आहे बाळ? सांग, भिऊ नकोस."

"तुम्ही सदरा का नाही घालीत? मी माझ्या आईला सांगू का? ती सदरा शिवून देईल. तुम्ही घालाल का? माझ्या आईच्या हातचा सदरा तुम्ही घालाल का?"

"घालीन, परंतु एक अट आहे बाळ. मी काही एकटा नाही."

"मग आणखी किती हवेत? आई दोन देईल शिवून."

"बाळ, मला ४० कोटी भावंडं आहेत. चाळीस कोटींच्या अंगावर वस्त्र येईल तेव्हा मलाही मग सदरा चालेल. तुझी आई ४० कोटी सदरे देईल का शिवून?"

महात्माजींनी मुलाची पाठ थोपटली. ते निघून गेले. गुरुजी आणि विद्यार्थी राष्ट्रातील दरिद्रीनारायण डोळ्यांसमोर येऊन गंभीर झाले. महात्माजी राष्ट्राशी एकरूप झालेले होते. ते राष्ट्राची मायमाउली होते.

☆ ☆ ☆

१७

आज निराळ्या धर्तीची गोष्ट आहे. तुम्ही कवी व काव्य-गायक श्री. सोपानदेव चौधरी यांचे नाव ऐकले असेल. ते सत्कवी आहेत. आणि त्यांचे काव्यगायन म्हणजे अपूर्व मेजवानी असते. रेडिओवरून त्यांनी महात्माजींवर स्वतःची कविता एकदा म्हणून दाखविली होती. त्यांनीच मला पुढील अनुभव सांगितला होता.

एकदा महात्माजींचा दौरा चालू असता ते खानदेशात आले होते. जळगावला प्रचंड सभा झाली. खेड्यापाड्यांतून हजारो शेतकरी आले होते. गिरणा नदीकाठचे कोळी लोकही सभेला आले होते. सभा संपून जनतेचा लोंढा परत माघारा जात होता. गोष्टी बोलत लोक जात होते. ते पहा दोन कोळी. त्यांची जाळी त्यांच्या खांद्यावर आहेत. त्यांचे बोलणे चालले आहे :

" गड्या, आपण लई पापी. गांधीबाप्पा तर अहिंसा सांगतो. आणि आपण दिनरात मासे पकडतो. आपलं सारं आयुष्य हिंसेत जातं. बरं, धंदा न करावा तर करायचं काय, खायचं काय ? 'कोणाला मारू नका' ते म्हणाले. आपण मच्छी-मारीचा धंदा सोडून दिला तर दुसरा कोणता करता येईल ? जवळ शेती ना भाती. नदीच्या पाण्यात आपली शेती, माशांची शेती,-कसं करायचं ? "

" अरे, पण तू चिंता का करतोस ! गांधीबाप्पाला सगळ्यांची काळजी आहे. उद्या स्वराज्य आलं म्हणजे गांधीबाप्पा आपल्याला बोलावतील. म्हणतील, 'मासे नका मारू. हिंसा नका करू. तुमच्यासाठी हा धंदा निवडला आहे. हा शिका नि नीट संसार करा.' अरे, त्याला सगळ्यांची काळजी आहे. आपला पोटापाण्याचा प्रश्न का त्यांना दिसणार नाही ? नवीन धंदा मिळाला की ही जाळी तोडून देऊ फेकून गिरणेत. तोपर्यंत चालवू हा धंदा. काय करायचं ? परंतु गांधीबाप्पाला सर्वांची चिंता आहे. चल, रात होईल. "

☆ ☆ ☆

साने गुरुजींचे वाङ्मय १

सुंदर पत्रे, भाग १ ला (आ. ७)	२–००
सुंदर पत्रे, भाग २ रा (आ. ५)	२–००
सुंदर पत्रे, भाग ३ रा (आ. ३)	२–००
धडपडणारी मुले, खंड २ रा (आ. ७)	४–००
इस्लामी संस्कृती, मुहमद पैगंबर चरित्र	४–००
साधना (आ. २)	२–५०
श्यामची पत्रे (आ. २)	६–००
माझी दैवते	१–५०
दिगंबरराय	०–८०
जीवनाचे शिल्पकार (आ. ३)	०–६०
भारतीय नारी (आ. ३)	०–६०
कुमारांपुढील कार्य	०–५०
गोरी गाय	०–६०
कावळे	०–५०
आपले नेहरू (आ. ५)	०–७५
लोकमान्य टिळक (आ. ३)	०–७५
भगवान श्रीकृष्ण (आ. २)	०–७५
साक्षरतेच्या कथा (आ. ४)	०–७५
दारूबंदीच्या कथा (आ. ३)	०–५०
बापूजींच्या गोड गोष्टी, भाग १ ला (आ. ८)	०–५०
बापूजींच्या गोड गोष्टी, भाग २ रा (आ. ८)	०–५०
बापूजींच्या गोड गोष्टी, भाग ३ रा (आ. ८)	०–५०
बापूजींच्या गोड गोष्टी, भाग ४ था (आ. ७)	०–५०
बापूजींच्या गोड गोष्टी, भाग ५ वा (आ. ६)	०–५०
बापूजींच्या गोड गोष्टी, भाग ६ वा (आ. ५)	०–५०

साधना प्रकाशन, पुणे